**International Journal of Humanities and Social Science Research**
**ISSN: 2455-2070; Impact Factor: RJIF 5.22**
**www.socialresearchjournals.com**
**Volume 2; Issue 8; August 2016; Page No. 105-106**

# सावरकर आंबेडकर एक समांतर प्रवास – एक ग्रंथ परीक्षण

**डॉ. रविन्द्र नारायणराव मुन्द्रे**

इतिहास विभाग प्रमुख, श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला, महाराष्ट्र, भारत।

**प्रस्तावना**

इतिहास लेखन करीत असतांना इतिहास संशोधकांनी संदर्भ ग्रंथाचा वापर विवेकनिष्ठ राहून करणे आवश्यक आहे. कारण अनेक संदर्भ ग्रंथ म्हणून पुढे येणारे लेखन आपल्या संशोधनामध्ये संभ्रम निर्माण करणारे ठरू शकते. असाच एक संदर्भ ग्रंथ परीक्षणार्थ घेतल्या आहे, जो पूर्णतः समाजातील वाचक आणि संशोधकामध्ये संभ्रम निर्माण करणारा आहे.

सावरकर आणि आंबेडकर जन्मापासूनच्या आलेखामध्ये साधर्म्य दाखविण्याचा केविलवाणा प्रयत्न लेखकाकडून झालेल्या दिसतो. सावरकर आणि आंबेडकर हे भिन्न सामाजिक वातावरणात जन्मास आलेले आहे. त्यामुळे जन्मतः प्राप्त होणारी प्रतिष्ठा जी सावरकरांजवळ होती ती आंबेडकर यांचेकडे नव्हती. आंबेडकरांना उच्चशिक्षित झाल्यावरही जी सामाजीक प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकली नाही, ती सावरकरांना जन्मतः प्राप्त झाली होती.

हेमंत चोपडे यांनी धर्म आणि धम्म यामधील फरक सांगताना धर्मामध्ये नीतीचा समावेश केला आहे. परंतू धम्मामध्ये नीतीचा समावेश करायला ते विसरले. बुध्द आणि त्याचा धम्म या ग्रंथामध्ये धम्म म्हणजे नीती आणि नीती म्हणजे धम्म म्हणणारे बाबासाहेब आंबेडकर आणि ईशवराचे स्थान ज्यांनी नीतीला दिले; त्या धम्मात लेखकाने नीतीचा समावेश न करणे म्हणजे ब्राम्हणवादी दृष्टीकोनातून धर्म श्रेष्ठ ठरविणे होय.

लेखकाने सावरकर–आंबेडकर यांच्या मुस्लिम व मुसलमान धर्माविषयीची भूमिका व राष्ट्रवाद यामध्ये तसूभरही अंतर नव्हते; असे दाखविण्याची प्रयत्न केला आहे. परंतु सावरकरांचा राष्ट्रवाद हा हिंदुत्वाच्या आधारावर व मुसलमानांच्या द्वेशावर आधारीत होता, असे त्यांच्या अनेक वक्तव्यावरून आणि लेखनावरून दिसून येते. मी पहिलेही भारतीय आहे आणि शेवटीही भारतीय आहे. (I am Indian first & Indian Last) असे म्हणणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सावरकरांपेक्षा व्यापक अर्थाने आणि अधिक राष्ट्रवादी वाटतात. जेव्हा जेव्हा भारतीय राष्ट्रवादाला मुस्लिमांकडून धोका पोहचत आहे असे दिसून येत होते तेव्हा तेव्हा आंबेडकर मुसलमानांच्या धोरणांना विरोध करित होते. धनंजय किर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या चरि़त्र ग्रंथात म्हणतात. ''बाबासाहेबांनी धर्मांतर करून हिंदू धर्मावर उपकार केले. नव्हे भारतीयांवर अनंत उपकार केले. कारण दुसरा कोणताही धर्म त्यांनी स्विकारला असता तर देशाच्या राष्ट्रीय अखंडतेवर, एकसंघतेवर, महाभयंकर परिणाम झाला असता, याची खोंलवर जाणीव त्यांना होती.'' भारतीय म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर याची भूमिका आणि राष्ट्रवादाबद्दलची संकल्पना सावरकरांपेक्षा पूर्णतः भिन्न होती.

क्रांतीधर्माचे प्रवर्तक म्हणून सावरकर आणि धर्मक्रांतीचा महामेरू, म्हणून आंबेडकरांकडे पाहिल्या जाते, असे लेखकाला वाटते. परंतू सावरकरांचा क्रांतीधर्म हा पूर्णतः त्यांनी स्वधर्माशी संबधीत सांगितला आहे. तर आंबेडकरांची धर्मक्रांती ही दरिद्री, अमानवीय वागणूक असणारे, हक्काची जाणीव नसणारे, आणि मानवीय व्यवहार ज्या संस्कृतीने नाकारला अश्या सनातन संस्कृतीला नाकारून नवजीवन, मानवीय अधिकाराची प्राप्ती, मानवा–मानवात उचीत व्यवहार निर्माण करण्याला प्रवृत्त करणाऱ्या संस्कृतीचा स्विकार म्हणजे धर्मक्रांती होय. हे लेखक सांगू शकले असते. परंतु लेखकाचा सावरकरांना श्रेष्ठ ठरविण्याचा डाव त्यामुळे उधळला गेला असता.

लेखकाने सावरकरांच्या तत्वज्ञानाचे दोन आधारस्तंभ सांगताना पहीला बलाढय व प्रियतम भारतमातेच्या मुक्ततेसाठी केलेली राष्ट्रक्रांती व दुसरा देशाचे अनंतकाळ स्वांतत्र्य टिकून राहावे म्हणून स्विकारलेली जीवनपध्दती हिंदुत्ववाद''. सावरकरांचा हिंदुत्ववाद पूर्णतः एक धर्म ही भूमिका स्विकारते. त्यामुळे इतर धर्मियांना संरक्षण उपलब्ध करून देऊ शकत नाही. कारण हिंदुत्ववाद ब्राम्हणवादाचे प्रमुख वैशिष्टये आहे.

सावरकर–आंबेडकर गांधी निर्मित अहिंसेला कडाडून विरोध करतात. याबाबत मात्र दोघांचे ही मते बऱ्याच अशी जुळलेली दिसतात. ''आत्यंतिक अहिंसा पाप आहे''. असे सावरकर म्हणतात तर ''आत्यंतिक अहिंसेचा पगडा आज हजारो वर्षापासून बसला असल्याकारणाने लोक भेकड व दुबळे झाले आहे. त्यांचा आत्मविश्वास नाहिसा झाला आहे. या आत्यंतिक अहिंसेच्या तत्त्वानेच वागा म्हणून सांगेल तो त्यांच्या मित्र नसून शत्रू आहे''. सावरकर आणि आंबेडकर या दोघांनीही पूर्वापार जी अहिंसा प्रतिपादण्यात आली आहे तिची व्याख्या, तिच्या मर्यादा आणि तिचा व्याप संत तुकारामाने आपल्या एका अभंगात सांगितलेला आहे.

> ''दया ते चि नांव भूतांचे पालन
> आणिक निर्दळण कंटकांचे''.

संत तुकारामांनी केलेली अहिंसेची व्याख्या, त्यामध्ये आणिक निर्दळण कंटकांचे हा तुकारामाच्या व्याख्योतील अत्यंत महत्वाचा भाग दोद्यांनाही मान्य होता. लेखकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अहिंसेला तत्व म्हणून स्विकारले त्याला नियम होऊ दिले नाही; हे स्पष्ट करणे आवश्यक होते कारण एखादया तत्वाला नियम म्हणून स्विकारल्यास त्याचे काय भयंकर परिणाम होतात याची डॉ. आंबेडकर यांना जाणीव होती. तत्व आणि नियम यांच्यात फरक आहे व तो फरक मोठा आहे. (Principle is to be followed) नियम पाळावयाचा असतो. ;त्नसम पे जव इम वइमलमकद्ध नियम झाला की मनुष्य त्याच्या गुलाम होतो. तत्व ठरले की मनुष्य त्याचा उपासक होतो; गुलाम होत नाही. हा फरक ध्यानात न आल्याकारणाने अनेक समाज रसातळास गेले आहेत. तत्व लवचिक असते, नियम कडक असतो. त्याला मोडता येत नाही. नियम मात्र समाजाची मोडतोड करू शकतो. नियम अडाण्याकरिता असतो. तत्व शहाण्याकरिता असते तत्त्व प्रगतीला बाधा आणू शकत नाही. नियम गती खुंटवितो.

बौध्द, जैन, शिख, पारसी, हिंदू हे सर्व सावरकरांच्या भाषेत हिंदूच होते, असे सावरकर जेव्हा म्हणतात तेव्हा ते प्राचीन भारतीय इतिहासाला नाकारतात कारण प्राचिन भारतात हिंदू म्हणून कुणीही एक नव्हते तर जैन आणि बौध्द यांची स्वतंत्र अशी संस्कृती होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मात्र सर्व संस्कृतीचे सार्वभौमत्व आणि स्वतंत्र अस्तित्व मान्य करतात. ''जैन आणि बौध्द ही स्वंतत्र संस्कृती होती, आणि भारतीय संस्कृती म्हणून सुध्दा अशी कोणती संस्कृती अस्तित्वात नव्हती.'' लेखकाने डॉ. आंबेडकर यांचे स्वतंत्र संस्कृतीचे

मत पुस्तकात समाविष्ट केले नाही. सावरकरांचा हिंदुत्ववाद कसा राष्ट्रीयत्व म्हणून सिध्द करता येईल हाच प्रयत्न त्यांनी केला आहे.
लेखकाने आंबेडकारांचा समतेचा सिध्दांतसुध्दा विकृत करून मांडलेला दिसून येतो. डॉ. आंबेडकरांची समता ही विषमतेवर आधारीत होती. सशक्तांवर प्रतिबंध व अशक्तांना संरक्षण हा त्यांचा समतेचा सिध्दांत होता. आणि हाच सिध्दांत त्यांनी राज्यघटनेत सुध्दा समाविष्ट केला. आरक्षणाचा हक्क प्रदान करून डॉ. आंबेडकर यांनी अशक्तांना संरक्षण मिळवून दिले आहे.
नेतृत्व आणि वक्तृत्व हे दोनही गुण सावरकर – आंबेडकर यांचे जवळ होते. परंतु दोघ्यानांही वेगवेगळया उद्देशाने वापरात आणले. सावरकरांनी आपले वक्तृत्व हिंदुत्ववाद प्रस्थापित करण्यासाठी आणि ब्रिटीशांच्या विरोधात हिंदू संघटन करण्यासाठी वापरले. यांच वक्तृत्वाच्या भरोश्यावर त्यांनी हिंदू महासभेचे नेतृत्व 30 डिसेंबर 1937 ला प्राप्त केले. हजारोच्या सभेला सावरकर ओघवत्या व प्रभावशाली भाषणाने मंत्रमुग्ध करीत. सावरकरांनी स्थापन केलेल्या अभिनव भारत या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी नेतृत्व आणि वक्तृत्व या गुणांनी संपूर्ण देशाला भारावून सोडले होते. डॉ. आंबेडकरांच्या वक्तृत्व कलेचा परिचय त्यांच्या आयुष्याच्या प्रत्येक भाषणातून येतो. घटना समितीत केलेले भाषण असो किंवा हिंदू कोडबिलाला झालेल्या विरोधाला उत्तर देणे असो. त्यांनी आपल्या वक्तृत्व आणि ज्ञानाने संपूर्ण भारतीयावर जादू केली होती. डॉ. आंबेडकरांनी आपल्या वक्तृत्व कलेचा उपयोग येथील अस्पृश्य लोकांमध्ये स्वाभीमान जागृत करण्यासाठी केला. व या देशाला भेडसावत असणाऱ्या जातीव्यवस्था आणि स्त्री अत्याचारासारख्या अनेक समस्यावर उपाय म्हणून वापरला. त्यांनी केलेल्या देशहीताच्या उपाययोजना लोकांसमोर आल्यावर, त्यांच्या तल्लख बुध्दीमत्तेचा परिचय झाल्यावर त्यांच्यावर घटना निर्मितीची जबाबदारी देण्यात आली. सावरकरांसारखे बालपणी वक्तृत्व आणि नेतृत्वाचे धडे आंबेडकरांना मिळाले नाही. म्हणूनच सावरकर जन्मजात नेते होते, तर आंबेडकरांना आपल्या वक्तृत्व, कार्य आणि जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या कर्तव्यातुन त्यांना या देशाने नेतृत्व प्रदान केले.
लेखकाने सावरकर–गांधी–आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळी बद्दलचा आलेख मांडतांना गांधीजीची अस्पृश्यता निर्मुलनाची चळवळ वरपांगी होती, हे सांगण्याचा प्रयत्न केला. सावरकर आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याबाबत (अस्पृश्यता निर्मुलन चळवळ) सावरकर कसे आंबेडकरांसारखे सामाजिक कार्यकर्ते होते, हे दाखविण्याचा अशक्त प्रयत्न केला आहे. ''आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करण्यापूर्वीच सहा वर्षे अगोदर वीर सावरकरांनी आपली अस्पृश्यता चळवळ सूरू केली होती.'' लेखकाच्या या व्याक्यातून पुन्हा एकदा सावरकर श्रेठत्व दाखविण्याचा केविलवाणा प्रयत्न लेखकाने केला आहे.
लेखक सावरकर– आंबेडकर 1857 ते 1947 या प्रकरणात 1857 चा उठाव हा सावरकरांना स्वांतत्र्यसमर वाटत होते. तर आंबेडकरांना ब्रिटीशांविरूध्द मुस्लिमांनी घोषीत केलेला जिहाद होता, असे सांगतात. पुढे 1947 च्या स्वांतत्र्यप्राप्तीच्या वेळी फाळणीची प्रक्रिया सुरू असतांना सावरकर फाळणीच्या विरोधात असतात, तर आंबेडकर फाळणीच्या बाजूने असतात. सावरकर फाळणीच्या विरूध्द बाजूने असल्याचे समर्थन करतांना म्हणतात. ''फाळणी करून ही समस्या सुटणार नसून सर्व धर्मियांना समान अधिकार असलेले हिंदू राष्ट्रच त्याला उत्तर आहे''. सावरकराच्या या विधानाला उद्धृत करून लेखकाने सावरकरांची वैचारीक परस्पर विरोधी भूमिका वाचकांसमोर ठेवली आहे. म्हणजे एकीकडे हिंदूराष्ट्र म्हणायचे आणि दुसरीकडे सर्व धर्मियांना समान अधिकार देऊ, असे म्हणायचे. वास्तविक सावरकरांनी फक्त मुस्लिमांना समान अधिकार देऊ असे म्हणायला पाहिजे होते. कारण सावरकर, जैन, बौध्द, षिख, पारषी यांना स्वतंत्र धर्म मानतचं नव्हते तर ते हिंदूच आहे असे म्हणत.
लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारत सरकारने भारतरत्न दिले म्हणून गौरव करतात. एवढेच नव्हे तर तो भारतरत्न पुरस्काराचा गौरव होता हे सत्यसुध्दा सांगतो. परंतू सावरकरांना भारतरत्नाने गौरविले नाही म्हणून दुःख व्यक्त करतात. दलितांनी आंबेडकरांना पूर्णपणे स्विकारले आहे परंतू सावरकरांना हिंदूमहासभेव्यतिरिक्त कुणीही स्विकारले नाही, हे दुःखसुध्दा लेखक मांडतो. वर्तमान परिस्थीतीत अमेरिकेचं जगातील राजकारण, पाकिस्तानचे धर्मांध धोरण, देशात पोसल्या जाणारे धर्मांध अनुनयकरण, देशाच्या राज्यघटनेला गौणत्व देऊन धार्मिक चोचले पुरविण्याचे धोरण या पार्श्वभूमीवर सावरकरांचे विचार पुन्हा अंकुरीत व्हायला लागले आहेत असा आशावाद लेखक व्यक्त करतो. परंतू लेखक घटनेच्या गौणत्वाचा मुद्दा मांडतो तेव्हा तो हे विसरतो की, घटनेने धर्मनिरपेक्षता हे तत्त्व सांगितले आहे. त्यामुळे सावरकरांचे भारताला हिंदूराष्ट्र बनविण्याचे स्वप्न हे काव्य म्हणूनच योग्य वाटते.
सावरकर–आंबेडकर यांचे लेखन विशिष्ट ध्येयपूर्ती म्हणजे समाजजागृती व राष्ट्रभक्ती होते असे लेखकाला वाटते. सावरकरांचे लेखन कवितेपासून सुरू झाले तर आंबेडकरांचे लेखन संशोधन प्रबंधापासून सूरू झाले. सावरकरांनी पहिली कविता 11 व्या वर्षी लिहीली. तर आंबेडकरांचा पहिला संशोधन प्रबंध 24 व्या वर्षी लिहीला गेला. आंबेडकरांचे संपूर्ण लेखन आणि संशोधन हे देशाच्या, समाजाच्या, लोकांच्या, समस्या शोधण्यासाठी आणि त्यावर प्रभावी उपाययोजना निर्माण करण्यासाठी लिहील्या गेले आहे असे दिसून येते. तर सावरकरांच्या लेखनात हिंदुराष्ट्र, ब्राम्हण, आणि ब्रिटीशविरोध दिसून येते.
सावरकर–आंबेडकर यांच्यात साम्यता व वेगवेगळेपणा काय होते, यावर लेखकाने एक प्रकरणचं लिहीले आहे. या प्रकरणामध्ये त्यांनी जो वेगळेपणा दाखविला आहे तो पुस्तकाला दिलेल्या शीर्षकाला साजेसा वाटत नाही. कारण संपूर्ण प्रकरणामध्ये सावरकर – आंबेडकर यांचे विचार किती विरोधी होते याची प्रचिती प्रत्येक व्याक्यागणिक येतांना दिसते. सावरकर हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व, सशस्त्र क्रांतीलढा ही तत्त्वप्रणाली मान्य करतात तर आंबेडकर हिंदुत्व हे ब्राम्हणवादाचे वैशिष्टये मानतात व ब्राम्हणवाद नष्ट करणे हे आपला लढा मानतात. आंबेडकरांची मनुस्मृती जाळणे ही कृती सावरकरांना अत्याचार वाटते तर अस्पृश्य व स्त्रियांना हिन लेखून उतरंडीची विषमता (Graded Inequality) निर्माण करण्याची सुरूवात करणाऱ्या मनुस्मृतिला जाळणे आपल्या लढयाची सुरूवात मानतात.
दोन मानवांच्या समांतर प्रवास तेव्हाच होतो जेव्हा दोघ्यांचेही ध्येय एक असते. परंतु सावरकरांचे ध्येय भारताला हिंदुराष्ट्र बनविण्याचे होते तर आंबेडकरांचे ध्येय या देशाला राष्ट्र बनविण्याचे होते. सावरकर हिंदु या संकल्पनेत बौध्द, जैन, षिख, पारषी यांना समाविष्ट करतात व हे सर्व हिंदू आहे, असे सांगतात. तर आंबेडकर बौध्द, जैन, हिंदु हे वेगवेगळे आहे व त्यांची संस्कृती व विचारप्रणाली वेगळी आहे; नव्हे स्वतंत्र आहे हे मान्य करतात. त्याचबरोबर बाबासाहेबांची राष्ट्र ही संकल्पना जातीविहीन समाजवादी समाजरचना निर्माण करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषांवार प्रांतरचनेवरील विचार राष्ट्र या शब्दाने राष्ट्रीय ऐक्याची भावना निर्माण होते, असे सांगते. म्हणूनच भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत India Nation या शब्दाऐवजी We the people of India हे कसे योग्य आहे हे आपल्या तात्विक युक्तीवादाने पटवून देतात.
हिंदूराष्ट्र या संकल्पनेत मात्र राष्ट्रीय ऐक्याची भावना पुसटशीही दिसून येत नाही. म्हणून लेखकाने या दोन महापुरूषांचा (सावरकर हिंदुमहासभेसाठी व आंबेडकर या संपुर्ण भारत देशासाठी) समांतर प्रवास पुस्तकाच्या माध्यमातून दाखविण्याचा प्रयत्न म्हणजे समाजामध्ये संभ्रम निर्माण करण्याचे षडयंत्र होय.